नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ५६ /२०२६ दि. २३/०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, नौपाडा वाहतूक उपविभागाचे हद्दीत **कोपीनेश्वर सांस्कृतीक न्यास ठाणे** आयोजीत **'गुढीपाडवा व नववर्ष स्वागत यात्रा ' दि. १९/०३/२०२६ रोजी सकाळी ०६:३० वा. कोपिनेश्वर मंदीर येथुन सुरु होणार आहे.** सदरवेळी मा. उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ४५०० ते ५००० लोकांचा जनसमुदाय सहभागी होणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) डॉ. मुस चौक कडून हॉटेल साई कृपा कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. मुस** चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने जांभळी नाका, चिंतामणी चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) राम मारूती रोडने गोखले रोड कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **वंदना टि पॉईंट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	गजानन महाराज चौक येथे डावेव वळण घेवुन दगडी शाळा चिंतामणी ज्वेलर्स मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) गोखले रोड कडून राम मारूती रोडने पु. ना. गाडगीळ चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मढवी हाऊस समोर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने गोखले रोड – केम्ब्रिज – सत्यम कलेक्शन – घंटाळीदेवी मंदीर रोड – श्रध्दा वडापाव – पु.ना. गाडगीळ चौक येथे डावीकडे वळण घेवुन गजानन महाराज चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	४) तलावपाळी, गडकरी सर्कल कडुन डॉ. मुस चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गडकरी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने गडकरी सर्कल, दगडी शाळा, अल्मेडा चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	५) खोपट सिग्नल मार्गे अल्मेडा सिग्नलकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अल्मेडा सिग्नल कडुन वंदना टि पॉईंटकडे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने उजवे वळण घेवुन टि.एम.सी. सर्कल – नितीन जंक्शन मार्गे इच्छीत स्थळी जातील.
नो पार्किंग –	१) चिंतामणी चौक ते गडकरी सर्कल तलावाची बाजू व सेंट जॉन स्कूल मागील बाजूस रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.
	२) गजानन महाराज चौक ते गोखले रोड दरम्यान राम मारूती रोडवर रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.
	३) साई कृपा हॉटेल ते एस.बी.आय. कॉर्नर दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना **दि. १९/०३/२०२६ रोजी सकाळी ०५:०० ते १५:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(**पंकज शिरसाट**)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.